महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र. १६३(२)/२०१९/१४-ब** **दिनांक- २९ सप्टेंबर, २०२१**

## -:प्रसिद्धीपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ अंतिम निकाल.**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०४/२०१९ व अधिसूचना क्रमांक १२/२०१९.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महसुल व वन विभागातील सहायक वन संरक्षक, गट-अ तसेच वनक्षेत्रपाल, गट-ब या संवर्गांतील एकूण १०० पदांवरील भरतीकरीता दिनांक १५ सप्टेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ चा अंतिम निकाल दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेत अहमदनगर जिल्ह्यातील श्री. दिघे वैभव सुरेश (बैठक क्रमांक-MB००१३०६) हे राज्यातून तसेच मागासवर्गीयातून प्रथम आले असून पुणे जिल्ह्यातील श्रीमती पानसरे पुजा भाऊसाहेब (बैठक क्रमांक-MB००५१३८) या महिलांमधून प्रथम आल्या आहेत.

**२.** वनक्षेत्रपाल पदाकरीता खेळाडूसाठी आरक्षित ०४ पदांचा तसेच अन्य ०३ पदांचा निकाल प्रशासकीय कारणास्तव तसेच अन्य एका उमेदवाराचा निकाल मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राखून ठेवण्यात येत आहे. यास्तव, प्रस्तुत पदांची गुणवत्तायादी, गुणांची वर्गवारीनिहाय सीमारेषा यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल.

**३.** प्रस्तुत निकाल विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**४.** प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके उपलब्ध करुन दिल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे विहित पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

ठिकाण- मुंबई

उपसचिव, परीक्षा-२
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई